दिनेश
बिल्डींग मटेरियल सप्लायर्स
खडी, क्रेशेन, वन फोर, डबर, वॉशटेन, मुरूम, वीट, सिमेंट ब्लॉक
(सुट्ट सिमेंट मिळेल...)
मो. नं. 9271713368, 9860330587

दैनिक
# आकर्षण
संपादक : विजय सांगळे




वर्ष ५ । अंक २२९ । सोमवार ८ जून २०२६ । पाने ४ । मूल्य ₹ २ https://epaper.dainkaakarshan.com E-mail- dainikaakarshan@gmail.com RNI NO. MAHMAR/2021/84322

# दिल्लीतील इंडिया आघाडीच्या बैठकीत २५ पक्षांचा सहभाग

## उद्धव ठाकरे यांची ऑनलाईन उपस्थिती

**नवी दिल्ली । वृत्तसंस्था–** इंडिया आघाडीच्या बैठकीत देशभरातून एकूण २५ राजकीय पक्ष सहभागी झाले होते. त्यामध्ये, महाराष्ट्रातील महाविकास आघाडीचे तिन्ही प्रमुख पक्षांचा सहभाग होता. त्यामध्ये, शरद पवारांच्या राष्ट्रवादीच्या खासदार सुप्रिया सुळेंची दिल्लीतील बैठकीला उपस्थिती होती, तर शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे हे ऑनलाईन हजर होते. नुकतेच पार पडलेल्या ५ राज्यांच्या विधानसभा निवडणुकीनंतर इंडिया आघाडीची ही पहिलीच बैठक असल्याने प.बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जींच्या उपस्थितीतकडे सर्वांचे लक्ष लागले होते. या बैठकीपूर्वी काँग्रेस नेत्या सोनिया गांधी आणि ममता बॅनर्जी यांची गळाभेट लक्षवेधी ठरली.

इंडिया आघाडीच्या आजच्या बैठकीत ५ मुद्द्यांवर सहमती झाली, या मुद्द्यांवर आघाडी काम करणार असून लढणार आणि पुढे जाणार असल्याची माहिती काँग्रेस अध्यक्ष तथा इंडिया आघाडीचे नेते मल्लिकार्जुन खर्गे यांनी दिली. त्यामध्ये, एसआयआर, नीट पेपरफुटीवरुन केंद्रीय शिक्षणमंत्र्यांचा राजीनामा, देशाची आर्थिक स्थितीसंदर्भाने प्रामुख्याने चर्चा झाली. तसेच, पुढील बैठक हैदराबाद येथे होणार असल्याचंही जाहीर करण्यात आलं. विशेष म्हणजे कॉकरोच जनता पार्टीने पहिल्या आंदोलनात उचलून धरलेला मुद्दाही इंडिया आघाडीच्या बैठकीत प्रकर्षणाने जाणवला. त्यानुसार, केंद्रीय शिक्षणमंत्र्यांची राजीनाम्याची मागणी करण्यात आली आहे. दरम्यान, इंडिया आघाडीच्या या बैठकीवर सत्ताधारी भाजप महायुतीच्या नेत्यांकडून टीका होत आहे. शिवसेना मुख्य नेते एकनाथ शिंदे हे दिल्लीतच असल्याने त्यांनी तेथून इंडिया आघाडी आणि काँग्रेस नेत्यांवर टीका केलीय. तर, उद्धव ठाकरेंनाही टोला लगावला.

### एकनाथ शिंदेंचा ठाकरेंना टोला

एकनाथ शिंदेंनी इंडिया आघाडीच्या बैठकीवर टीका केली असून काँग्रेसची भूमिका दिसते की, इतर पक्षांना सोबत घेऊन त्यांना संपवावे. देशात काँग्रेस हा एकच विरोधी पक्ष राहावा. काँग्रेसने आपल्यासोबत घेऊन सर्वच पक्ष डीएमके, आरजीडी, टीएमसी यांना विधानसभा निवडणुकीत पराभूत केलेय, असे म्हणत काही लोक फेसबुक लाईव्ह आले, स्वतःचा फेस दाखवला बाकी कोणाचा बघितला नाही आणि निघून गेले, अशी बोचरी टीकाही एकनाथ शिंदेंनी उद्धव ठाकरेंच्या इंडिया आघाडीतील उपस्थितीवरुन केली.

### दर दोन महिन्यांनी होणार बैठक

इंडिया आघाडीच्या बैठकीत पाच मुद्द्यांवर एकमत झाले. त्यात दर दोन महिन्यांनी बैठक होण्याचाही मुद्दा आहे. १. लवकरच सरन्यायाधीश यांना एसआयआरवर पत्र लिहिणार २. धर्मेंद्र प्रधान यांचा तात्काळ राजीनामा झाला पाहिजे ३. आर्थिक स्थिती, बेरोजगारी आणि शेतकरी मुद्द्यांवर केंद्र सरकारने तात्काळ सर्वपक्षीय बैठक बोलवावी ४. प्रत्येक दोन महिन्यांनी इंडिया आघाडीची बैठक होणार, पुढील बैठक हैदराबाद येथे होणार ५. पावसाळी अधिवेशनात इंडिया आघाडीतील पक्षाचे समन्वय साधला जाणार, दररोज विरोधी पक्षाच्या कक्षात बैठक होणार यासह लोकांच्या हिताच्या मुद्द्यावर चर्चा झाल्याचे सांगण्या आले.

# धक्कादायक: शिर्डीत भाविकांच्या आरोग्याशी खेळ

## अन्न व औषध प्रशासनाचे झोपेचे सोंग, आयुक्त तुकाराम मुंढेंच्या धडाक्याची प्रतीक्षा!

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**शिर्डी–** राज्यभरात अन्नभेसळखोरांविरोधात धडाकेबाज मोहीम राबवून काही दिवसांतच त्यांना पळता भुई थोडी करणारे अन्न व औषध प्रशासनाचे नवनियुक्त आयुक्त तुकाराम मुंढे यांनी पदभार हाती घेतल्यापासून सर्वत्र कारवाईचा धडाका सुरू झाला आहे. यामुळे गेल्या अनेक वर्षांपासून अक्षरशः कुंभकर्ण झोपेत असलेले अन्न व औषध प्रशासन खडबडून जागे झाल्याचे चित्र आहे. मात्र, दुसरीकडे शिर्डीसारख्या जागतिक दर्जाच्या पवित्र तीर्थक्षेत्री अजूनही मोठ्या प्रमाणात वेगवेगळ्या माध्यमातून अन्नभेसळ करत भाविकांच्या आरोग्याशी खेळण्याचे पाप काही महाभाग करत आहेत. असे असतानाही राहता तालुक्यासह जिल्ह्यातील अन्न व औषध प्रशासन अजूनही झोपेचे सोंग घेऊन असल्यामळे भाविकांमधून तीव्र संताप व्यक्त होत आहे.

शिर्डीत श्री साईबाबांच्या दर्शनासाठी देश–विदेशातून येणाऱ्या भाविकांसाठी मंदिर परिसराभोवती प्रसादाची मोठी दुकाने आहेत. मात्र, या दुकानांवर विक्रीसाठी येणारा पेढा गेल्या अनेक वर्षांपासून अतिशय निकृष्ट दर्जाचा असल्याचे समोर येत आहे. अन्न व औषध प्रशासनाच्या कोणत्याही नियमांचे येथे पालन केले जात नसून, अक्षरशः दगडासारखे कडक झालेले दगडी पेढे भाविकांच्या माथी मारले जात आहेत. यामुळे साईभक्तांच्या आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.

साई न्यूजच्या माध्यमातून याआधीही या निकृष्ट दर्जाच्या पेढ्यांबाबत वेळोवेळी आवाज उठवण्यात आला होता. त्यावेळी अन्न व औषध प्रशासन तसेच नगरपरिषद प्रशासनाने केवळ दाखवण्यापुरती जुजबी कारवाई केली आणि नंतर परिस्थिती पुन्हा जैसे थे झाली. प्रशासनाच्या या ढिसाळ कारभारामुळे भाविकांच्या आरोग्याशी खेळण्याचा हा घातक खेळ पुन्हा राजरोसपणे सुरू झाला आहे. आजही शिर्डीतील सर्वच प्रसादाच्या दुकानांवर अवघ्या २०० ते २५० रुपये किलो दराने चक्क पेढा विकला जात आहे. या पेढ्यांच्या पाकिटावर दूध, साखर, इलायची आणि जायफळ असे घटक पदार्थ असल्याचे नमूद केलेले असते. मात्र, सध्याच्या महागाईच्या काळात एवढ्या स्वस्त दरात मिळणाऱ्या पेढ्यात खरोखरच हे शुद्ध पदार्थ आहेत का? याची तपासणी करण्यासाठी शिर्डीसारख्या आंतरराष्ट्रीय तीर्थक्षेत्री कोणतीही सक्षम किंवा अधिकृत यंत्रणा उपलब्ध नाही, हे दुर्दैव आहे.

नियम पाळणे तर दूरच, पण कोणत्याही प्रसादाच्या आणि पेढ्यांच्या पाकिटावर पॅकिंगची तारीख आणि वापरण्याची अंतिम तारीख नमूद केलेली नसते. त्यामुळे कित्येक दिवसांचे जुने आणि कडक झालेले पेढे भाविकांना विकले जात आहेत. तालुक्यातील स्थानिक अन्न व औषध प्रशासन या गंभीर प्रकारावर कोणतीही कारवाई करण्याच्या मनस्थितीत दिसून येत नाही. स्थानिक अधिकाऱ्यांच्या या अकार्यक्षमतेमुळे आता थेट राज्याचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनीच या प्रकरणात स्वतः लक्ष घालण्याची गरज निर्माण झाली आहे. मुंढेंनी शिर्डीत विशेष पथक पाठवून या पेढ्यांचे नमुने तपासणीसाठी जप्त करावेत आणि दोषींवर कठोर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी आता साईभक्तांकडून आणि सुज्ञ नागरिकांमधून जोर धरू लागली आहे.




## दै. आकर्षण निवडक

### पोलिसांच्या कथित हलगर्जीपणामुळे शेतकऱ्याची आत्महत्या?



**अहिल्यानगर- बेलवंडी पोलीस स्टेशनमधील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी वेळेत न्याय न देता वारंवार अपमानास्पद वागणूक दिल्याने आणि तक्रारीची दखल न घेतल्याने माझे पती किरतमल झरलाल चव्हाण यांनी नैराश्यातून आत्महत्या केल्याचा गंभीर आरोप मृताच्या पत्नी शैलाबाई किरतमल चव्हाण यांनी केला आहे. या प्रकरणातील संबंधित पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांवर तात्काळ कारवाई करून त्यांना निलंबित करावे, अशी मागणी त्यांनी जिल्हाधिकारी आणि जिल्हा पोलीस अधीक्षक यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. शैलाबाई चव्हाण या श्रीगोंदा तालुक्यातील घोटवी गावच्या रहिवासी असून, त्या पती व दोन मुलांसह शेती आणि मोलमजुरी करून उदरनिर्वाह करत होत्या. त्यांच्या निवेदनानुसार, शेजारी राहणारे भावबंधू यांच्याशी मागील काही वर्षांपासून वाद सुरू होता.दिनांक २२ एप्रिल २०२६ रोजी दुपारी साडेतीनच्या सुमारास त्यांचे भावबंधू यांनी दारूच्या नशेत शैलाबाई व त्यांचे पती किरतमल चव्हाण यांना शिवीगाळ केल्याचा आरोप आहे. वाद टाळण्यासाठी दोघे शेतात कांदे काढण्यासाठी जात असताना सदर व्यक्तीने त्यांचा रस्ता अडवून मारहाण केली. या हल्ल्यात शैलाबाई यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली असून त्यातून रक्तस्राव सुरू झाला होता. तसेच जीवे मारण्याची व संपूर्ण कुटुंब संपवून टाकण्याची धमकीही दिल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.घटनेनंतर त्याच दिवशी सायंकाळी सुमारे सात वाजता पती-पत्नी बेलवंडी पोलीस स्टेशनमध्ये तक्रार देण्यासाठी गेले. मात्र, तेथे उपस्थित असलेल्या एका महिला पोलीस कर्मचाऱ्याने त्यांची तक्रार न घेता अपमानास्पद शब्दांत बोलल्याचा आरोप करण्यात आला आहे. ''उद्या सकाळी या, आज तक्रार घेता येणार नाही,'' असे सांगून त्यांना परत पाठवण्यात आल्याचे शैलाबाई यांनी म्हटले आहे. यामुळे निराश होऊन दोघे घरी परतले. मात्र, रात्री पुन्हा भावबंधू यांची पत्नी आणि मुलांनी मिळून मारहाण केल्याचा आरोप करण्यात आला आहे. या घटनेचा व्हिडिओ भीतीपोटी त्यांच्या लहान मुलाने मोबाईलमध्ये रेकॉर्ड केल्याचेही निवेदनात नमूद आहे.**

### भीमशक्तीचे संस्थापक अध्यक्ष खा. चंद्रकांत हांडोरे यांचा अहिल्यानगरमध्ये जाहीर सत्कार



**अहिल्यानगर - भीमशक्ती संघटनेचे संस्थापक अध्यक्ष तथा राज्यसभा खासदार चंद्रकांत हांडोरे यांनी अहिल्यानगर शहरास सदिच्छा भेट दिली असता स्थानिक पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या वतीने त्यांचा उत्स्फूर्त सत्कार करण्यात आला. यावेळी सामाजिक, शैक्षणिक व संघटनात्मक विषयांवर चर्चा करण्यात आली. तसेच समाजातील विविध प्रश्नांबाबत मार्गदर्शन करताना खासदार हांडोरे यांनी संघटन बळकट करण्यासाठी कार्यकर्त्यांनी एकजुटीने काम करण्याचे आवाहन केले. या सत्कार समारंभप्रसंगी शशिकांत बनसोडे, एन. के. कांबळे, उत्तर महाराष्ट्र अध्यक्ष भाऊसाहेब साठे, शहर जिल्हाध्यक्ष संजय जगताप, अनिल साठे, मदन साठे, दशरथ शिंदे, विशाल भिंगारदिवे, अभय गायकवाड, अमोल कालकूट, अशोक खंडागळे, पोपट जाधव आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.**

# महाअंनिसच्या तीन दिवशीय विस्तारित राज्य कार्यकारीणीच्या बैठक

### प्रस्थापित संस्कृतीला विरोध करणाऱ्यांना राष्ट्रद्रोही-देशद्रोही ठरवले जात आहे- जगदीश काबरे

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर-** वैदिक काळापासून अंधश्रद्धा निर्मूलनाचे काम आपल्याकडे सुरू झालेले आहे. त्याला वैदिक संस्कृती मधल्या कर्म करणा ऱ्यांनी विरोध निर्माण केला, तो आज ही सूरु असून प्रस्थापित संस्कृतीला विरोध करणाऱ्यांना आणि व्यवस्थेला प्रश्न विचारणाऱ्यांना राष्ट्रद्रोही-देशद्रोही ठरवले जात असल्याचे भाष्य विवेकवादी विचारवंत जगदीश काबरे यांनी केले.




नगर शहरातील बडी साजन मंगल कार्यालयात शहीद डॉ.नरेंद्र दाभोलकर स्थापित महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती आणि विवेक जागर संस्था आयोजित तीन दिवशीय विस्तारित राज्य कार्यकारीणीच्या बैठकीला शुक्रवार दि.५ जून पासून सुरुवात झाली.विवेकवादी लेखक जगदीश काबरे यांच्या हस्ते या राज्यस्तरीय बैठकीचा शुभारंभ झाला. महा.अंनिसचे राज्य निमंत्रित कॉ.बाबा आरगडे(नेवासा), राज्य कार्यवाह अड.रंजना गवांदे(संगमनेर), राज्य अध्यक्ष माधव बावगे (लातूर), राज्य कार्याध्यक्ष संजय बनसोडे (सांगली),राज्य प्रधान सचिव ठकसेन गोराणे (नाशिक),गजेंद्र सुरकार(वर्धा),विनायक सावळे (शहादा),रूकसाना मुल्ला (लातूर), विजय परब (मुंबई), राज्य सरचिटणीस शहाजी भोसले (छत्रपती संभाजीनगर), सुधाकर काशीद (सोलापूर),कृष्णात स्वाती (कोल्हापूर),आरती नाईक (पनवेल), उत्तरेश्वर बिराजदार (लातूर),सुरेश बोरसे (धुळे),विलास निंबोरकर (गडचिरोली), प्रकाशन विभाग राज्य कार्यवाह मच्छिंद्रनाथ मुंडे, अहिल्यानगर जिल्हाध्यक्ष बाबासाहेब बुधवंत, कार्याध्यक्ष विष्णू गायकवाड, उपाध्यक्ष प्रमोद भारुळे व डॉ. प्रकाश गरुड, जिल्हा प्रधान सचिव विनायक सापा व देवदत्त साळवे,सोशल मिडिया कार्यवाह सुखदेव फुलारी, कायदे विषयक सल्लागार अड.अभय राजे, बुवाबाजी संघर्ष सचिव प्रा.शशिकांत गायकवाड,जात पंचायत सचिव कारभारी गायकवाड,संविधान जागर सचिव दिपक शिरसाठ,विविध उपक्रम विभाग सचिव बी.के. चव्हाण,महिला सहभाग कार्यवाह छाया बंगाळ, निधी संकलन विभाग सचिव प्रा.अशोक गवांदे,जिल्हा कार्यवाह सांस्कृतिक विभाग कार्यवाह मल्हारी खेडकर, नगर शहराध्यक्ष भारतभूषण भागवत, शहर कार्याध्यक्ष विनायक ताकपेरे, नेवासा अध्यक्ष कॉ.अप्पासाहेब वाबळे, बबनराव धावणे,चिमाजी धनवडे,अनिता सापा आदि व्यासपीठावर उपस्थित होते.

श्री.काबरे पुढे म्हणाले की,चार्वाकने पारंपारिक धर्म, वेद, आणि कर्मकांड यांना थेट आव्हान दिले. त्यांने पंचइंद्रियांनी जे जे अनुभवले त्यालाच प्रत्यक्ष प्रमाण मानले,म्हणून चार्वाकचा छळ झाला. सत्ताधारी कितीही प्रबळ असला तरीही आपण प्रश्न विचारायला घाबरू नये,आपण सत्ताधाऱ्यांना तिथे चुकतील तिथे प्रश्न विचारलेच पाहिजेत आणि त्याची योग्य ती उत्तरे किंवा त्यांच्या दबाव निर्माण केला पाहिजे आणि अशा प्रकारचा दबाव निर्माण करणारी अंधश्रद्धा निर्मूलन समिती ही एकमेव चळवळ आहे. या चळवळीत काम करणारे आपण सगळे कार्यकर्ते जेव्हा काम करतो तेंव्हा आपल्याला सुद्धा अनेक लोक प्रश्न विचारतात त्याची उत्तरे देण्यासाठी कार्यकर्त्यांनी चार्वाक समजून घ्यायला हवा. राज्याध्यक्ष माधव बावगे म्हणाले, महाराष्ट्राच्या ३६ जिल्ह्यात अंनिसचे सगळे कार्यकर्ते हे कर्तव्य भावनेने काम करत आहेत. ग्राउंड लेव्हलवर काम करणारी ही एकमेव संघटना आहे. या सारख्या नावाच्या आणखी काही संघटना काम करत असतील, आमची कोणाची स्पर्धा नाही. आमची आमच्याशीच स्पर्धा आहे आणि आम्ही ती स्पर्धा कामातून दाखवत असतो. कार्यकर्ते घरातलं काम नंतर करतील, पण अगोदर चळवळीचं काम करतात. म्हणून ही संघटना ही चळवळ अतिशय लोकांच्या ओठावर आहे आणि ते नुसते शब्दांमधून नाहीतर कृतीमधून आहे.

राज्य कार्याध्यक्ष संजय बनसोडे यांनी अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या कार्यासाठी वाहून घेतलेल्या अहिल्यानगर जिल्ह्यातील दिवंगत कॉम्रेड पी.बी.कडू पाटील, शंकरराव घुले, रामचंद्र विनायक बंगाळ, रामचंद्र तावरे, भाऊसाहेब पाठक, नागेश कुसाळे, बाळासाहेब आगळे, डॉ. मच्छिंद्र वाघ, सुनीता कुसळे, विजया भारुळे या दिवंगत कार्यकर्त्यांची आठवणींना उजाळा दिला. विस्तारित कार्यकारिणीच्या बैठकीसाठी जिल्हा व शहर शाखेने उत्तम नियोजन केल्यामुळे केल्याबद्दल त्यांनी कार्यकर्त्यांना धन्यवाद दिले.

कॉ.बाबा आरगडे म्हणाले,अहिल्यानगर जिल्हा सत्यशोधकी विचाराचा वारसा आहे, राज्यात सध्या बुवाबाजीचे पीक वाढल्याने चळवळ वाढवण्याची गरज असल्याचे संगीतले.

# मान्सूनपूर्व सरींनी वाढवली कैरीच्या लोणच्याची लगबग

### बाजारपेठांमध्ये कैरी खरेदीसाठी महिलांची गर्दी



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पैठण-** मान्सूनपूर्व पावसाच्या पहिल्याच सरींनी वातावरणात गारवा निर्माण होताच घराघरांत कैरीच्या लोणच्याची तयारी सुरू झाली आहे. वर्षभर पुरेल असे चटकदार आणि पारंपरिक चवीचे लोणचे बनविण्यासाठी महिलांची लगबग वाढली असून बाजारपेठांमध्ये गावरान कैरी खरेदीसाठी मोठी गर्दी होत आहे.

लोणच्यासाठी आवश्यक असलेल्या ताज्या, घट्ट आणि आंबट गावरान कैऱ्यांना सध्या मोठी मागणी आहे. यंदा बाजारात कैरी २५ ते ३० रुपये प्रतिकिलो दराने उपलब्ध असल्याने ग्राहकांना काहीसा दिलासा मिळाला आहे. मात्र, वाढत्या महागाईचा परिणाम लोणच्यासाठी लागणाऱ्या मसाल्यांच्या दरावर दिसून येत आहे. लाल तिखट, मोहरी डाळ, मेथी, हळद, हिंग तसेच खाद्यतेलाच्या किमती वाढल्याने गृहिणींच्या खर्चात वाढ झाली आहे.

बाजारपेठांमध्ये अनेक महिला कैऱ्या जागेवरच फोडून घेण्यास प्राधान्य देत आहेत. यासाठी विक्रेत्यांकडून प्रतिकिलो अतिरिक्त शुल्क आकारले जात असले तरी त्यामुळे घरातील मेहनत वाचत असल्याने ग्राहकांचा त्याला चांगला प्रतिसाद मिळत आहे. लोणच्याचा खमंग स्वाद आणि टिकाऊपणा कायम राहावा यासाठी दर्जेदार मसाल्यांची खरेदीही जोमात सुरू आहे. ग्रामीण भागातील अनेक शेतकरी कुटुंबांना स्वतःच्या शेतातील कैऱ्यांचा आधार मिळत असला, तरी नोकरदार आणि शहरी कुटुंबांना बाजारातूनच कैऱ्या खरेदी कराव्या लागत आहेत.

पहिल्या पावसाच्या सरींसोबतच बाजारपेठांमध्ये कैरी आणि लोणच्याच्या साहित्याचा दरवळ पसरला असून आगामी काही दिवसांत या वस्तूंच्या विक्रीत आणखी वाढ होण्याची शक्यता व्यापाऱ्यांनी व्यक्त केली आहे. पारंपरिक खाद्यसंस्कृती जपण्याची ग्रामीण भागातील महिलांची परंपरा आजही कायम असल्याचे चित्र यानिमित्ताने दिसून येत आहे.

# निंबळक येथे महिला आरोग्य जनजागृती शिबिर पार पडले

### महिलांसाठी मोफत ओपीडी, गर्भवती मातांची मोफत तपासणी, शुगर व ईसीजी तपासणीची सुविधा उपलब्ध होणार

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर-** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंती तसेच जागतिक मासिक पाळी स्वच्छता सप्ताहानिमित्त निंबळक येथे विशेष महिला आरोग्य जनजागृती शिबिर उत्साहात पार पडले. ''महिलांचे आरोग्य चांगले तर कुटुंबाचे आरोग्य चांगले'' या संकल्पनेतून आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमास महिला व किशोरी मुलींचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

कृष्णाली व कृष्णप्रित वेल्फेअर फाउंडेशन आणि सोशल कनेक्ट यांच्या संयुक्त विद्यमाने, जिल्हा परिषद सदस्य माधवराव लामखडे तसेच सरपंच सौ. प्रियांका अजय लामखडे यांच्या मार्गदर्शनाखाली या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. शिबिरात स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ. सुलभा पवार यांनी मासिक पाळी स्वच्छता, महिलांचे आरोग्य, रक्तक्षय (ॲनिमिया), स्त्रीरोगविषयक समस्या तसेच महिलांमध्ये आढळणाऱ्या विविध आरोग्यविषयक आजारांबाबत सखोल मार्गदर्शन केले. उपस्थित महिलांच्या शंकांचे निरसन करण्यात आले तसेच हिमोग्लोबिन



तपासणी करून आवश्यक आरोग्य सल्ला देण्यात आला. यावेळी आरोग्यविषयक समस्या असलेल्या महिलांना मोफत ओपीडी सेवा उपलब्ध करून देण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली. तसेच दर महिन्याच्या शेवटच्या शनिवारी गर्भवती मातांची मोफत तपासणी, सर्व रुग्णांची मोफत शुगर तपासणी आणि मोफत ईसीजी तपासणी करण्यात येणार असल्याची घोषणा करण्यात आली. ग्रामीण भागातील नागरिकांना दर्जेदार व सुलभ आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यासाठी हा उपक्रम सातत्याने राबविण्यात येणार असल्याचे आयोजकांनी सांगितले.

या कार्यक्रमास कृष्णाली व कृष्णप्रित वेल्फेअर फाउंडेशनचे अध्यक्ष प्रशांत पाटील शेळके, सचिव प्रियंका शेळके (बोबडे), सामाजिक कार्यकर्ते हर्षल आगळे, डॉ. अमित पवार, डॉ. सुमित आबेकर, डॉ. सतीश गेरंगे, ग्रामसेवक रासकर यांची प्रमुख उपस्थिती लाभली. उपस्थित मान्यवरांनी महिलांच्या आरोग्यविषयक जनजागृतीसाठी अशा उपक्रमांची आवश्यकता अधोरेखित केली.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सर्व मान्यवर, ग्रामस्थ, महिला भगिनी, किशोरी मुली तसेच स्वयंसेवकांचे आभार व्यक्त करण्यात आले.

# तुकाराम मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्रात तीन दिवसात १६ जिल्ह्यात ४३ ठिकाणी छापे

### दुग्ध व्यवसायिकांमध्ये खळबळ । महाराष्ट्रात दुधाचे उत्पादन १५ लाख लिटर आहे । दुधाचा खप मात्र ६५ लाख लिटर होतो । अतिरिक्त दुधाचे गौड बंगाल काय ?

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर-** महाराष्ट्रात दररोज सुमारे १५ लाख लिटर दूध उत्पादन होत असताना बाजारातील खप तब्बल ६५ लाख लिटर असल्याचा दावा समोर येतो, तेव्हा कोणत्याही सामान्य नागरिकाच्या मनात एकच प्रश्न निर्माण होतो उर्वरित दूध नेमके कुठून येते?

हा प्रश्न केवळ आकड्यांचा नाही, तर जनतेच्या आरोग्याशी निगडित आहे. अनेक वर्षांपासून कृत्रिम दूध, भेसळयुक्त दुग्धजन्य पदार्थ, रासायनिक मिश्रण आणि अन्न सुरक्षेच्या नियमांची पायमल्ली होत असल्याच्या तक्रारी सातत्याने होत होत्या. मात्र यावर प्रभावी आणि व्यापक कारवाई होताना क्वचितच दिसून आली. अशा परिस्थितीत अन्न व औषध प्रशासनाच्या माध्यमातून तुकाराम मुंडे यांच्या नेतृत्वाखाली ३ दिवसांत १६ जिल्ह्यांमध्ये ४७ ठिकाणी टाकण्यात आले. छापे हे केवळ प्रशासकीय दिखावा नाही, तर जनतेच्या आरोग्याशी निगडित उचललेले धाडसी पाऊल मानावे लागेल.



अन्नभेसळ हा साधासुधा गुन्हा नाही. तो थेट जनतेच्या जीवाशी खेळणारा आर्थिक दहशतवाद आहे. दूध, तूप, पनीर, मिठाई आणि इतर दुग्धजन्य पदार्थांमध्ये जर रासायनिक भेसळ होत असेल, तर त्याचे परिणाम लहान मुलांपासून ज्येष्ठ नागरिकांपर्यंत सर्वांवर होतात. नफ्याच्या हव्यासापोटी जनतेच्या आरोग्यावर केले जाणारे हे घाणेरडे प्रयोग कोणत्याही परिस्थितीत खपवून घेतले जाऊ नयेत. तुकाराम मुंडे यांची कार्यशैली राज्याला नवीन नाही. जिथे जबाबदारी दिली तिथे त्यांनी नियमांची अंमलबजावणी कठोरपणे केली. त्यामुळेच त्यांच्या कारवाईमुळे अनेकांना अस्वस्थता निर्माण होते. प्रश्न एवढाच आहे की, या कारवाईनंतर शासन त्यांना पूर्ण स्वातंत्र्य देणार का ? मुख्यमंत्री वारंवार भ्रष्टाचारमुक्त आणि पारदर्शक प्रशासनाची भूमिका मांडतात. आता त्या भूमिकेची खरी परीक्षा आहे. जर जनतेच्या आरोग्याशी खेळणाऱ्या रॅकेट्सवर कारवाई करायची असेल, तर तुकाराम मुंडे यांच्यासारख्या अधिकाऱ्यांना राजकीय आणि प्रशासकीय पाठबळ देणे आवश्यक आहे.

आज महाराष्ट्रातील नागरिक फक्त कारवाईची बातमी वाचत नाहीत, तर पुढे काय होते हे पाहत आहेत. छापे पडले, नमुने घेतले, गुन्हे दाखल झाले; पण त्यानंतर दोषींवर कठोर शिक्षा होते का? मोठी नावे समोर येतात का? राजकीय किंवा आर्थिक दबावामुळे प्रकरणे दाबली जातात का? याकडे जनतेचे लक्ष लागले आहे. तुकाराम मुंडे यांच्याकडे हे खाते कायम ठेवले जाते की पुन्हा बदलले जाते, हे देखील तितकेच महत्त्वाचे ठरणार आहे. कारण अनेकदा धडक कारवाई करणारे अधिकारी बदलीच्या राजकारणाचे बळी ठरल्याची उदाहरणे राज्याने पाहिली आहेत.

# शेतकरी राजाच्या नजरा आकाशाकडे; दमदार पावसाच्या प्रतीक्षेत खरीप हंगाम



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पैठण-** खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांनी शेतातील सर्व पूर्वतयारी पूर्ण केली असून आता त्यांची नजर दमदार पावसाकडे लागली आहे. मशागत, नांगरणी, वखरणी यासह पेरणीसाठी लागणारे बियाणे व खतांची व्यवस्था करण्यात आली असून शेतकरी पावसाच्या आगमनाची आतुरतेने वाट पाहत आहेत.

गेल्या काही दिवसांत अधूनमधून मान्सूनपूर्व सरी कोसळल्या असल्या तरी पेरणीसाठी आवश्यक असलेला समाधानकारक पाऊस अद्याप झालेला नाही. अपुऱ्या पावसात पेरणी केल्यास दुबार पेरणीचे संकट ओढवू शकते. त्यामुळे अनेक शेतकरी पुरेसा पाऊस झाल्यानंतरच पेरणी करण्याच्या तयारीत आहेत. खरीप हंगामात सोयाबीन, कापूस, मका, तूर आदी पिकांची लागवड मोठ्या प्रमाणावर केली जाते. या पिकांच्या चांगल्या उगवणीसाठी वेळेवर आणि पुरेशा प्रमाणात पाऊस होणे अत्यावश्यक आहे. त्यामुळे यंदाच्या हंगामाकडून शेतकऱ्यांना मोठ्या अपेक्षा आहेत. सध्या ग्रामीण भागात सर्वत्र पावसाचीच चर्चा रंगली असून शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर आशा आणि अपेक्षांचे भाव दिसून येत आहेत. वेळेवर पाऊस झाल्यास पिकांची उगवण चांगली होऊन उत्पादनात वाढ होईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. निसर्गाने कृपादृष्टी दाखवत लवकरच दमदार पावसाची हजेरी लावावी, अशी प्रार्थना शेतकरी राजा करत असून त्याच्या नजरा सध्या केवळ आकाशाकडेच खिळल्या आहेत.

आकर्षण हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी दैनिक आकर्षण प्रिंटर्स , प्लॉट क्र. ९२, भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस- प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक विजय शामराव सांगळे, व्यवस्थापक तुकाराम कामटे, मुख्य कार्यालयाचा फोन नंबर - ७७७६८१२८११. ई-मेल: dainikaakarshan@gmail.com. (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)

The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at DAINIK AKARSHAN PRINTERS, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). "Editor - Vijay Shamrao Sangale, Manager - Tukaram Kamte, Phone no. of main office-7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com ("The responsibility under the PRB Act will be on him.)

## दै. आकर्षण निवडक

### संत ज्ञानेश्वरांच्या पसायदानाकडे नव्या दृष्टीने पाहण्याची गरज- ॲड. गवळी



**अहिल्यानगर - संत ज्ञानेश्वर माऊलींनी सुमारे ८०० वर्षांपूर्वी रचलेल्या 'पसायदान' या विश्वकल्याणाच्या प्रार्थनेचा वैज्ञानिक आणि सामाजिक दृष्टिकोनातून नव्याने अर्थ लावण्यात आला आहे. पसायदान ही केवळ भक्तिपर प्रार्थना नसून मानवी विचार, वर्तन आणि समाजव्यवस्थेत परिवर्तन घडवून आणणारी एक क्रांतिकारक स्वशासन प्रणाली असल्याचा दावा पीपल्स हेल्पलाईनच्या वतीने करण्यात आला आहे. या संदर्भात एकात्मिक ज्ञानसिद्धांत (इंटिग्रेटेड नॉलेज थिअरी आयकेटी) मांडताना ॲड. कारभारी गवळी यांनी 'कल्पतरू आरव' आणि 'चेतना चिंतामणी' या संकल्पनांमध्ये मानवी विकासाचे गूढ तंत्र दडले असल्याचे सांगितले. ॲड. गवळी यांच्या मते, आजवर पसायदानाचा सखोल वैज्ञानिक अर्थ स्पष्ट होऊ शकला नव्हता. कारण त्यासाठी आधुनिक विज्ञानातील दोन महत्त्वाच्या शाखांची आवश्यकता होती. यातील पहिले शास्त्र म्हणजे न्यूरोप्लास्टिसिटी (मेंदूची परिवर्तनक्षम क्षमता). या विज्ञानानुसार माणसाचा मेंदू आयुष्यभर नवीन विचार, सवयी आणि अनुभवांच्या आधारे स्वतःमध्ये बदल घडवू शकतो. सातत्यपूर्ण सराव आणि चिंतनामुळे मेंदूतील विचारांचे मार्ग बदलतात आणि नवीन विचारसरणी विकसित होते. दुसरे महत्त्वाचे शास्त्र म्हणजे डीएनए आणि माहिती विज्ञान. डीएनए ही शरीरातील अनुवांशिक माहिती असते. मात्र व्यक्तीचे विचार, श्रद्धा, सामाजिक संस्कार, भीती, जातभावना आणि मानसिक सवयी या अनुवांशिक नसून बाहेरून प्राप्त झालेली माहिती असते. आयकेटी या माहितीला गैर-अनुवांशिक माहिती (नॉन-जेनेटिक इन्फॉर्मेशन) असे संबोधते. ही माहिती बदलणे शक्य असल्याचा दावा या सिद्धांतात करण्यात आला आहे. आयकेटीच्या मते पसायदानातील 'कल्पतरू आरव' ही संकल्पना प्रत्यक्षात मेंदूतील विचारांचे मार्ग बदलण्याच्या प्रक्रियेशी संबंधित आहे. आधुनिक भाषेत याला न्यूरोप्लास्टिसिटी ध्यान पद्धती असे म्हटले जाते. सतत सकारात्मक, सर्वसमावेशक, मानवतावादी आणि लोककल्याणकारी विचारांचे चिंतन केल्यास ते मेंदूत दृढपणे रुजतात. परिणामी जुन्या चुकीच्या सवयी, अंधश्रद्धा, संकुचित विचार आणि भेदभाव कमी होत जातात. त्यांच्या जागी समता, विज्ञाननिष्ठा, करुणा आणि समाजहिताचे विचार बळकट होतात. पसायदानातील 'चेतना चिंतामणी' ही संकल्पना आयकेटीमध्ये अत्यंत महत्त्वाची मानली जाते. याचा अर्थ प्रत्येक व्यक्तीने स्वतःच्या विचारांची जबाबदारी स्वीकारणे आणि जागृत विवेकाने जीवन जगणे असा लावण्यात आला आहे. आयकेटी या अवस्थेला रिकॉन्शिओ गव्हर्नन्स (जागृत चेतना आधारित स्वशासन) असे संबोधते. या प्रक्रियेत व्यक्ती स्वतःच्या विचारविश्वाची मालक बनते. जातीयता, अंधश्रद्धा, स्त्रीदास्य, मतांधता, स्वार्थ आणि द्वेष यांसारख्या नकारात्मक विचारांवर नियंत्रण ठेवून त्यांच्या जागी समता, वैज्ञानिक दृष्टिकोन, निसर्गप्रेम आणि सर्व जीवांबद्दल करुणा विकसित करण्याचा प्रयत्न करते.ॲड. गवळी यांनी भारतीय समाजातील जातीय भेदभाव आणि मानसिक गुलामगिरीवरही भाष्य केले. त्यांच्या मते, मनुस्मृतीसारख्या व्यवस्थांमुळे समाजात श्रेष्ठ-कनिष्ठपणा, जातीय विभागणी आणि सामाजिक असमानतेचे विचार खोलवर रुजले. ''मी, माझे, माझी जात आणि माझा मोक्ष'' या संकुचित विचारसरणीमुळे समाजाच्या प्रगतीला मोठा अडथळा निर्माण झाला. हे विचार अनुवांशिक नसून समाजव्यवस्थेद्वारे लादले गेलेले गैर-अनुवांशिक माहितीचे दोषपूर्ण नमुने असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. व्यक्तीच्या अंतर्मनातील विचारसरणी बदलण्यासाठी आवश्यक असलेली वैज्ञानिक साधने त्यावेळी उपलब्ध नव्हती. आयकेटी ही संकल्पना त्यांच्या सामाजिक परिवर्तनाच्या कार्याला वैज्ञानिक पूरकता देऊ शकते आणि सामाजिक क्रांतीच्या प्रक्रियेला पुढे नेऊ शकते, असे ॲड. गवळी यांनी नमूद केले.पसायदानाचा खरा संदेश जीवनात उतरविण्याची वेळ आता आली असल्याचे प्रतिपादन करताना ॲड. गवळी यांनी केले.**

# जागतिक सायकल दिनानिमित्त अहिल्यानगरात सायकलिंगचा जल्लोष

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** जागतिक सायकल दिनाचे औचित्य साधत सायकलिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्र यांच्या मान्यतेने जिल्हा सायकलिंग असोसिएशन आणि इन्फिनिटी सायकलिंग अकॅडमी व बाईक टेक पॉईंट यांच्या संयुक्त विद्यमाने रविवारी (दि. ७ जून) राज्यस्तरीय सायकलिंग स्पर्धा उत्साहात पार पडली. यासोबतच महिलांसाठी विशेष असलेल्या 'अस्मिता खेलो इंडिया वुमेन्स सायकलिंग लीग' देखील मोठ्या उत्साहात पार पडली. जिल्ह्यातील नामांकित महिला व पुरुष सायकलपटूंनी या स्पर्धेत सहभाग घेत सायकलिंगचा रोमांचक अनुभव दिला. जिल्ह्यातील सायकलपटूंच्या उत्स्फूर्त सहभागामुळे संपूर्ण वातावरण क्रीडामय झाले होते.

पेमराज सारडा महाविद्यालय मैदानापासून स्पर्धेला प्रारंभ झाला. महिलांना राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांमध्ये संधी मिळावी आणि सायकलिंग क्षेत्रात त्यांचे प्रोत्साहन वाढावे या उद्देशाने खेलो इंडिया अंतर्गत सलग दुसऱ्या वर्षी या लीगचे आयोजन करण्यात आले होते.

सकाळी ६ वाजता सारडा महाविद्यालय मैदानावरून 'स्लो झोन'च्या माध्यमातून स्पर्धेला सुरुवात झाली. पत्रकार चौक, डीएसपी चौक, स्टेट बँक चौक, चांदणी चौक, सोलापूर चौक मार्गे टँक म्युझियमपर्यंत सायकलपटूंनी प्रवास केला. टँक म्युझियमपासून मुख्य स्पर्धेला सुरुवात झाली. पुरुषांची स्पर्धा वाळुंज, चांदबिबी बायपास चौक मार्गे पुन्हा टँक म्युझियम येथे समाप्त झाली.




स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी शिवछत्रपती पुरस्कार विजेते गणेश पवार, राष्ट्रीय पदकविजेते गौरव सिंह, राष्ट्रीय स्तरावरील सायकलिंग प्रशिक्षक संकल्प थोरात, श्रीनिवास लोंढे, प्रा. साईनाथ थोरात, सायकलिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्रचे सचिव प्रा. संजय साठे, संभाजी मोहिते (कोच- इन्फिनिटी सायकलिंग अकॅडमी) , लाला कांबळे, वैभव भोर, सागर करांडे, राष्ट्रीय पदकविजेते ओम करांडे, बाळासाहेब दीक्षित, वासुदेव पांढरे, अनिल भवर, अशोक गाडेकर, शिवनाथ मोहिते, सरपंच विष्णू थोरात, किरण बोयणे, पांडुरंग भोजने, विकास भालेराव, मोबिन शेख तसेच सिंहगड सायकलिंग फाउंडेशन (पुणे)चे नितीनजी थोपटे आदी मान्यवर उपस्थित होते.

विजेत्यांना रोख रक्कम, मेडल्स आणि प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आली. महिलांसोबतच हौशी पुरुषांसाठी ४० किलोमीटर सायकल फन राईड, मेन्स ४० किलोमीटर स्पर्धा तसेच १८ वर्षांखालील मुलांसाठी २० किलोमीटर स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. स्पर्धेतील विजेत्यांसाठी एकूण ८० हजार रुपयांची रोख बक्षिसे देण्यात आली.

या स्पर्धेसाठी राष्ट्रीय सायकलिंग महासंघ, खेलो इंडिया आणि जिल्हा क्रीडाधिकारी कार्यालय यांचे विशेष सहकार्य लाभले. यावेळी अहिल्यानगर सायकलिंग असोसिएशन, सायकलिंग फेडरेशन ऑफ अहिल्यानगर तसेच राष्ट्रीय आणि राज्यस्तरीय यश मिळविणाऱ्या सायकलपटूंचा सत्कार करण्यात आला. स्पर्धा यशस्वी होण्यासाठी महाराष्ट्र पोलीस, शहर वाहतूक शाखा, जिल्हा रुग्णालय आणि पेमराज सारडा महाविद्यालय यांनी महत्त्वपूर्ण सहकार्य केले.

स्पर्धेचे पंच म्हणून प्रा. संजय साठे, प्रा. कल्पेश भागवत, प्रा. शैलेश गवळी, प्रा. रावसाहेब बाबर, प्रा. साईनाथ थोरात, क्रीडा अधिकारी विशाल गर्जे, प्रा. अविनाश काळे, प्रा. संजय धोपावकर आणि प्रा. दिनेशल भालेराव यांनी काम पाहिले.

स्पर्धेसाठी नरेंद्र फिरोदिया ( आय लव्ह नगर ), शौनक खराडे (), नदीम सय्यद ( हुंडेकरी लॉन्स), प्रताप (काका) ढाकणे(ममता इंटरप्राईजेस), दत्ता आढाव, सचिन राणे (व्हिजन नेक्स्ट), लॉरेन्स स्वामी(बालाजी इंटरप्राईजेस), शुद्धायू लाकडी तेलघाणा, अनमोल रेसीडेन्सी, अभिनंदन भन्साळी,(अवित्री बाइक्स इंडिया), पॉलीगोन इंडिया, सिंहगड फाऊंडेशन (पुणे), झावरेश नगरवाला, माजी सायकलिस्ट लाला कांबळे आणि यश ससे यांचे प्रायोजकत्व लाभले.

**स्पर्धेतील विजेते**

मास्टर गट (४० कि.मी.) प्रथम- खुद्दुस शेख, द्वितीय- रवी राजेश, तृतीय- हर्षल खांडवे, चतुर्थ - अकरम देवकाते, पाचवा- किरण पवार, सहावा- प्रविण पाटील. मेन्स गट (४० कि.मी.) प्रथम- सुर्या थट्टू, द्वितीय- सिद्धेश पाटील, तृतीय- सुदर्शन देढगावकर, चौथा- रिहान शेख, पाचवा- अश्विनी मर्ढेकर, सहावा उमेश बंजारा. १८ वर्षांखालील गट (२० कि.मी.)- प्रथम- मयंक पाखरे, द्वितीय- शुंभुराज यादव, तृतीय- आर्यन जाधव, चौथा- राजवर्धन शिंदे, पाचवा- शर्व वाळके

# सामाजिक कार्यकर्ते प्रकाश थोरात यांचा हेल्पिंग हॅण्ड फाऊंडेशनतर्फे गौरव



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** पीपल्स हेल्पलाईनचे सामाजिक कार्यकर्ते प्रकाश थोरात यांच्या सामाजिक कार्याबद्दल हेल्पिंग हॅण्ड फाऊंडेशनच्या नर्सिंग कॉलेजच्या वतीने त्यांचा गौरव करण्यात आला. समाजातील वंचित, दुर्बल, पीडित आणि अन्यायग्रस्त घटकांच्या हक्कांसाठी सातत्याने केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत हा सन्मान करण्यात आला. यावेळी जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून पर्यावरण संवर्धनाचा संदेशही देण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी हेल्पिंग हॅण्ड फाऊंडेशनच्या प्रमुख निर्मलाताई केदारी होत्या. त्यांच्या हस्ते थोरात यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी फाऊंडेशनचे पदाधिकारी, नर्सिंग कॉलेजचे प्राध्यापक, विद्यार्थी तसेच सामाजिक क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अध्यक्षीय भाषणात निर्मलाताई केदारी यांनी प्रकाश थोरात यांच्या सामाजिक कार्याचे विशेष कौतुक केले. त्या म्हणाल्या की, समाजातील गरजू, वंचित आणि अन्यायग्रस्त नागरिकांना न्याय मिळवून देण्यासाठी थोरात यांनी सातत्याने संघर्ष केला आहे. समाजहितासाठी निस्वार्थ भावनेने काम करणाऱ्या कार्यकर्त्यांमुळेच सामाजिक परिवर्तनाची प्रक्रिया अधिक बळकट होत असते. अशा व्यक्तींचा सन्मान करणे म्हणजे समाजसेवेच्या मूल्यांचा गौरव करण्यासारखे असल्याचे त्यांनी नमूद केले.

यावेळी जागतिक पर्यावरण दिनानिमित्त बोलताना निर्मलाताई केदारी यांनी पर्यावरण संवर्धनाचे महत्त्व अधोरेखित केले. वाढते प्रदूषण, जंगलतोड, हवामान बदल आणि पाणीटंचाई यांसारख्या समस्या संपूर्ण जगासमोर गंभीर आव्हान म्हणून उभ्या राहिल्या आहेत. या पार्श्वभूमीवर प्रत्येक नागरिकाने पर्यावरण संरक्षणासाठी आपली जबाबदारी ओळखणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. प्रत्येकाने किमान एक झाड लावून त्याचे संगोपन करावे, प्लास्टिकचा वापर कमी करावा, पाणी आणि विजेची बचत करावी तसेच स्वच्छतेच्या सवयी अंगीकाराव्यात, असे आवाहन त्यांनी केले.

# जागतिक पर्यावरण दिनानिमित्त राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या वतीने भिस्तबाग-महाल तलाठी कार्यालय रस्त्यालगत वृक्षारोपण

### कॉलनी अंतर्गत रस्त्यांच्या दुतर्फा फळझाडे; 'आंब्यांच्या झाडांचा प्रभाग' म्हणून परिसराची ओळख – संपत बारस्कर



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** जागतिक पर्यावरण दिनानिमित्त राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या वतीने भिस्तबाग–महाल तलाठी कार्यालय रस्त्याच्या बाजूने वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. पर्यावरण संतुलन, स्वच्छता आणि हरित विकासाचा संदेश देणाऱ्या या उपक्रमात विविध मान्यवर आणि नागरिकांनी सहभाग घेत वृक्षसंवर्धनाची सामूहिक जबाबदारी स्वीकारण्याचा निर्धार व्यक्त केला.

यावेळी मंडळ अधिकारी शैलजा देवकाते यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर, नगरसेवक डॉ. सागर बोरुडे, ग्राम महसूल अधिकारी सतीश तासतोंडे, कुणाल काळे, सुरेश तागड, मनोहर कनोरे, संदीप गोसावी, शरद गुंड, गणेश बोरुडे, दिनेश खेडकर, सचिन चितळकर आदींसह कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी बोलताना राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर म्हणाले की, प्रभागाच्या विकासाच्या योजनांबरोबरच पर्यावरण संतुलन राखण्यासाठी वृक्षारोपणाची व्यापक लोकचळवळ उभी करण्यात आली आहे. गेल्या दहा वर्षांपासून नागरिकांमध्ये वृक्षांचे महत्त्व रुजावे यासाठी मोठ्या प्रमाणात जनजागृती करण्यात आली. त्याचबरोबर नागरिकांना मोफत दहा ते पंधरा फूट उंचीची आंब्याची रोपे उपलब्ध करून देण्यात आली. त्यामुळे आज कॉलनी अंतर्गत रस्त्यांच्या दुतर्फा आंब्याची भरघोस झाडे दिसून येत असून या परिसराची ओळखच 'आंब्यांच्या झाडांचा प्रभाग' अशी निर्माण झाली आहे.

ते पुढे म्हणाले की, प्रभागातील डीपी रस्त्यांच्या दोन्ही बाजूंना विविध देशी वृक्षांची लागवड करण्याचे काम सातत्याने सुरू आहे.

# आरोग्य हीच खरी संपत्ती असून सर्वसामान्य नागरिकांना आरोग्य सुविधा मिळाल्या पाहिजेत : आमदार संग्राम जगताप

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–**आमदार संग्राम जगताप यांच्या वाढदिवसानिमित्त भिंगार येथे आयोजित करण्यात आलेले मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले. दिपक राहिंज, बुधराणी हॉस्पिटल पुणे, फिनिक्स फौंडेशन आणि श्रीगुरू ऑप्टीकल यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमाला नागरिकांचा मोठा प्रतिसाद मिळाला. आयोजित या शिबिरामध्ये अनेक नागरिकांची मोफत नेत्र तपासणी करण्यात आली. तसेच मोतीबिंदूने त्रस्त असलेल्या गरजू रुग्णांची पुढील शस्त्रक्रियेसाठी नोंदणी करण्यात आली. सर्वसामान्य नागरिकांना दर्जेदार आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला होता.



आमदार संग्राम जगताप म्हणाले की यांनी सामाजिक कार्यातून समाजाशी नाळ जोडून ठेवणे ही काळाची गरज असल्याचे सांगितले. वाढदिवस हा केवळ शुभेच्छा स्वीकारण्याचा दिवस नसून समाजासाठी उपयुक्त ठरणारे उपक्रम राबविण्याची संधी आहे. आरोग्य हीच खरी संपत्ती असून सर्वसामान्य नागरिकांना आरोग्य सुविधा मिळाल्या पाहिजेत असे मत त्यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाचे आयोजक दिपकदादा राहिंज यांनी उपस्थितांचे आभार मानत सांगितले की, गरजू आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल नागरिकांना मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रियेचा लाभ मिळावा हा या शिबिरामागील मुख्य उद्देश होता. नागरिकांनी दिलेला उत्स्फूर्त प्रतिसाद आमच्यासाठी प्रेरणादायी आहे. यापुढेही अशा सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे.

या कार्यक्रमास माणिकराव विधाते, नगरसेवक संपत बारस्कर, छावणी परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी पल्लवी विजयवंशी, नगरसेवक बाली बांगरे, पोलीस निरीक्षक जगदीश मुलगीर, वसंत राठोड, स्वप्निल ढवण, महेश झोडगे, संजय सपकाळ, जालिंदर बोरुडे, विठ्ठलराव लोखंडे, मंगेश (गुड्डू) खताळ, जालिंदर दुतारे आदी मान्यवर उपस्थित होते. सामाजिक कार्यकर्ते, ज्येष्ठ नागरिक तसेच परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित राहिले.

# हज यात्रेकरूंच्या लगेज प्रकरणावर उलेमा बोर्ड आक्रमक

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** हज यात्रेकरूंच्या लगेजमध्ये झालेल्या कथित चोरी, छेडछाड आणि सामान वितरणातील विलंबाच्या प्रकरणावर ऑल इंडिया उलेमा बोर्ड रजिस्टर्डने तीव्र नाराजी व्यक्त करत संबंधित यंत्रणांकडे कठोर प्रश्न उपस्थित केले आहेत. या प्रकरणाची तात्काळ दखल न घेतल्यास देशव्यापी आंदोलन छेडण्याचा इशाराही बोर्डाने दिला आहे.

ऑल इंडिया उलेमा बोर्ड रजिस्टर्डचे नॅशनल जनरल सेक्रेटरी अंजर अन्वर खान यांनी प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, हज कमिटी ऑफ इंडिया, केंद्रीय अल्पसंख्याक व्यवहार मंत्रालय, केंद्रीय मंत्री किरेन रिजिजू, परराष्ट्र मंत्रालय तसेच विमानतळ प्राधिकरण यांनी हज यात्रेकरूंना त्यांचे सामान वेळेवर का मिळाले नाही याबाबत स्पष्टीकरण द्यावे.

खान यांनी प्रश्न उपस्थित करताना म्हटले की, इतकी कडक सुरक्षा व्यवस्था, देखरेख आणि तपासणी यंत्रणा अस्तित्वात असताना लगेजमधून चोरी आणि वस्तूंची छेडछाड कशी झाली? यात्रेकरूंच्या बॅगांचे लॉक कोणी तोडले? हज यात्रेकरूंचे सामान सुरक्षित ठेवण्यात संबंधित यंत्रणा अपयशी ठरत असतील तर त्याची जबाबदारी कोण स्वीकारणार?

ऑल इंडिया उलेमा बोर्ड रजिस्टर्डने या प्रकरणात तातडीने कारवाई करण्याची मागणी करत काही प्रमुख मागण्या मांडल्या आहेत. त्यामध्ये प्रत्येक विमानतळ आणि लगेज हबमधील सीसीटीव्ही फुटेजची सखोल तपासणी करणे, चोरी गेलेले मौल्यवान सामान शोधून परत मिळवून देणे, प्रभावित यात्रेकरूंना संपूर्ण नुकसानभरपाई देणे, दोषी अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाई करणे तसेच विमानतळ प्राधिकरण आणि संबंधित यंत्रणांच्या निष्काळजीपणाची उच्चस्तरीय चौकशी करणे यांचा समावेश आहे.

# शिखर चातुर्मास २०२६ च्या तयारीला प्रारंभ : आनंद तीर्थ-समवशरण येथे 'क्षेत्र विशुद्धी' समारंभ

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** महाराष्ट्र प्रवर्तक प.पू. कुंदन ऋषिजी म. सा यांच्या सानिध्यात उपाध्याय प्रवर परमपूज्य श्री प्रवीण ऋषीजी म.सा. यांचा २०२६ मध्ये होणारा भव्य 'समर्पण सर्व कल्याण' शिखर चातुर्मास सोहळ्याच्या तयारीचा शुभारंभ आनंदधाम परिसरात उत्साहात करण्यात आला. चातुर्मासासाठी उभारण्यात येणाऱ्या 'आनंद तीर्थ–समवशरण' या मुख्य प्रवचन स्थळाच्या भूमीवर जैन परंपरेनुसार 'क्षेत्र विशुद्धी' हा मंगल विधी संपन्न झाला.

गुरु सुमती शिष्य उपप्रवर्तक परमपूज्य श्री अभिषेक मुनीजी म.सा., गुरु हेम शिष्य उपप्रवर्तक परमपूज्य श्री आशिष मुनीजी म.सा., गुरुवर्या परमपूज्य विभाश्रीजी म.सा. तसेच साध्वी डॉ. आभाश्रीजी म.सा. यांच्या पावन सान्निध्यात हा समारंभ पार पडला.

चातुर्मास सोहळ्याचे प्रमुख आधारस्तंभ सौरभजी परागजी बोरा यांच्या मातोश्री सौ. प्रमिलाबाई हेमराजजी बोरा व भगिनी डॉ. निलिमाजी बोरा यांच्या हस्ते जैन धार्मिक विधीनुसार कलशपूजन व मंगल विधी संपन्न झाले. यावेळी चातुर्मास समितीचे पदाधिकारी अशोक बाबुशेठ बोरा, राजेश भंडारी, आदेश चंगेडिया, विलास कटारिया, अनिल पोखरणा, सुरेश कांकरिया, मनसुख गुंदेचा, राजकुमार बोरा, सचिन देसरडा, विजय गुगळे, अभय गांधी, अभिजीत गांधी, विनोद कटारिया, आदींसह सकल जैन समाजाचे व उपनगरातील सर्व श्रावक संघाचे पधादीकरी अनिल कटारिया, कांतिलालजी गांधी, दिलीप मेहेर, संदीप गांधी, अतुल शिंगवी, अशोक बलदोटा, संतोष शेटिया, दर्शन गांधी, कचरदास लुंकड, ईश्वर बोरा, पेमराज पोखरणा, विजय गुगळे, जवाहर कटारिया, किशोर गांधी, संजय ताथेड, किरण रांका, रमेश सोनीमंडलेचा, अरविंद गुंदेचा, अनिल लोढा, विनोद गांधी, राजू ताथेड, सुभाष पोखरणा, सचिन डुंगरवाल, जितेंद्र नहार, अशोक गांधी, सुधीर चोपडा, पोपट कटारिया, धनेश बरमेचा, किशोर गुगळे, सुधीर मुथा, योगेश चंगेडिया, हिरालाल चंगेडिया, पारस कासवा, सुभाष बोथरा, संतोष बोरा, अशोक भंडारी, संजय चोपडा, सुभाष बायड, संजय गांधी, संजय बोरा, मनोज गुगळे तसेच विविध सामाजिक संस्था चे सदस्य व मोठ्या संख्येने श्रावक-श्राविका उपस्थित होते.

याप्रसंगी चातुर्मास समितीचे बाबुशेठ बोरा यांनी सांगितले की, उपाध्याय प्रवर पूज्य श्री प्रवीण ऋषीजी म.सा. यांचा २०२६ मधील चातुर्मास हा 'शिखर चातुर्मास' ठरणार असून चार महिन्यांच्या या कालावधीत विविध धार्मिक प्रवचने, साधना शिबिरे, आध्यात्मिक उपक्रम व धर्मप्रभावना कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे.

आनंदधाम येथे वाढत्या भाविकसंख्येमुळे जागेची मर्यादा लक्षात घेऊन आनंदधाम शेजारील विस्तीर्ण पटांगणावर सुमारे ५० हजार चौरस फूट क्षेत्रफळाचा भव्य समवशरण मंडप तसेच २५ हजार चौरस फूट क्षेत्रफळाचे भोजनगृह उभारण्यात येणार आहे. या ठिकाणी परमपूज्य गुरुदेवांच्या प्रवचनांसह विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन होणार असून, कालपासून मंडप उभारणीच्या कामालाही प्रत्यक्ष प्रारंभ झाला आहे. त्याच प्रमाणे आनंदधाम येथे पूर्ण चातुर्मास कार्यकाळात गुरुदेवांचा मंगलमय वास्तव्य असणार असून आनंदधाम येथे देखील शिबिरांचे आयोजन करण्यात आलेले आहेत.



अर्हम विज्जा प्रणेते उपाध्याय प्रवर पूज्य श्री प्रवीण ऋषीजी म.सा. यांनी प्रशिक्षित केलेल्या 'कल्याण मित्र टीम'च्या माध्यमातून हा 'क्षेत्र विशुद्धी' कार्यक्रम पार पडला. जैन आगम व शास्त्राधारित मंगल विधींमार्फत सामाजिक व कौटुंबिक कार्यक्रमांचे आयोजन करणारी ही टीम कार्यरत आहे.

यावेळी उपस्थितांना संबोधित करताना वक्त्यांनी सांगितले की, आगामी चातुर्मास काळात हजारो साधकांना ज्ञानार्जनाची संधी मिळणार असून शेकडो साधकांची तपश्चर्या व आराधना या पावन भूमीत फलद्रूप होणार आहे. त्या दृष्टीने आनंद तीर्थ–समवशरण भूमीवरील 'क्षेत्र विशुद्धी' हा सोहळा चातुर्मासाच्या तयारीतील एक महत्त्वपूर्ण आणि मंगलमय टप्पा ठरला आहे.

कार्यक्रमाचे समारोपिक संभोदनात आदेश चंगेडिया यांनी उपस्थितांना सांगितले की, आगामी ''समर्पण सर्व कल्याण'' शिखर चातुर्मास २०२६ हा केवळ एक धार्मिक कार्यक्रम नसून संपूर्ण समाजाच्या एकजुटीचा आणि समर्पणाचा महोत्सव आहे. हा चातुर्मास अहिल्यानगरच्या धार्मिक इतिहासात सुवर्णाक्षरांनी नोंदला जावा, यासाठी सर्व उपनगर श्रावक संघ, महिला मंडळे, युवक मंडळे तसेच धर्मप्रेमी बंधू-भगिनींनी तन-मन-धनाने सहभाग नोंदवावे असे आवाहन त्यांनी केले. गुरुदेवांच्या कृपेने आणि सर्वांच्या सहकार्याने हा शिखर चातुर्मास अभूतपूर्व, अविस्मरणीय आणि भावी पिढ्यांसाठी आदर्श ठरेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. यानंतर त्यांनी उपस्थितांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता केली.

# भारतीय १७ वर्षांखालील ग्रीको–रोमन कुस्ती संघाला आशियाई अजिंक्यपद

## मुख्य प्रशिक्षक डॉ. पै. संतोष भुजबळ यांचा संभाजी राजे कुस्ती केंद्राच्या वतीने सत्कार



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** व्हिएतनाम येथे पार पडलेल्या १७ वर्षांखालील आशियाई कुस्ती अजिंक्यपद स्पर्धेत भारतीय ग्रीको–रोमन कुस्ती संघाने विविध वजनगटांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करत रौप्य व कांस्य पदकांची कमाई केली आणि भारताला प्रतिष्ठेची संघ चॅम्पियनशिप मिळवून दिली. या ऐतिहासिक यशामध्ये भारतीय संघाचे मुख्य प्रशिक्षक म्हणून महत्त्वपूर्ण भूमिका बजावणारे डॉ. पै. संतोष भुजबळ यांचा संभाजी राजे कुस्ती केंद्र, पवननगर यांच्या वतीने उत्साहपूर्ण वातावरणात सत्कार करण्यात आला.

यावेळी कुस्ती केंद्राचे संस्थापक पैलवान शिवाजी चव्हाण, अध्यक्ष नितीन आव्हाड, अजित वाघ, संदीप गायकवाड, अतिश ठाकूर, यश टाकवाणे, प्रताप गायकवाड, युवराज चव्हाण, अमित गाडे, अविनाश मोरे यांच्यासह कुस्तीपटू, प्रशिक्षक आणि क्रीडाप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सत्काराला उत्तर देताना मुख्य प्रशिक्षक डॉ. पै. संतोष भुजबळ म्हणाले की, ''जिद्द, चिकाटी आणि अथक मेहनतीच्या जोरावर कोणतेही यश संपादन करता येते. विद्यार्थ्यांनी केवळ शैक्षणिक क्षेत्रापुरते मर्यादित न राहता क्रीडा क्षेत्राकडेही गांभीर्याने पाहिले पाहिजे. आज क्रीडा क्षेत्रात करिअरच्या असंख्य संधी उपलब्ध आहेत. बालवयातच आपले ध्येय निश्चित करून त्यादृष्टीने सातत्याने प्रयत्न केल्यास मोठे यश मिळविता येते.

ते पुढे म्हणाले की, ''व्हिएतनाम येथे झालेल्या आशियाई अजिंक्यपद स्पर्धेत भारतीय कुस्तीपटूंनी उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत विविध वजनगटांमध्ये पदकांची कमाई केली. या यशामुळे भारतीय कुस्तीची ताकद पुन्हा एकदा आशियाई स्तरावर अधोरेखित झाली आहे. अहिल्यानगरमधील संभाजी राजे कुस्ती केंद्रातील खेळाडूंनीही विविध शालेय, जिल्हास्तरीय व राज्यस्तरीय स्पर्धांमध्ये सहभागी होऊन उल्लेखनीय यश मिळवावे आणि राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर जिल्ह्याचे नाव उज्वल करावे.

यावेळी पैलवान शिवाजी चव्हाण म्हणाले की, ''डॉ. संतोष भुजबळ यांना भारतीय कुस्ती संघाचे मुख्य प्रशिक्षक म्हणून आशियाई स्पर्धेसाठी संधी मिळणे ही अहिल्यानगरसाठी अभिमानाची बाब आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली भारतीय संघाने उल्लेखनीय यश मिळविले. त्यांच्या अनुभवाचा आणि प्रशिक्षणाचा फायदा देशभरातील कुस्तीपटूंना झाला आहे. त्यामुळे संभाजी राजे कुस्ती केंद्राच्या वतीने त्यांचा सत्कार करून आम्ही त्यांच्या कार्याचा गौरव करत आहोत.

ते पुढे म्हणाले की, ''डॉ. भुजबळ हे सध्या अहिल्यानगर कुस्ती संघाचे सचिव म्हणूनही कार्यरत असून जिल्ह्यातील कुस्ती चळवळ मजबूत करण्यासाठी सातत्याने प्रयत्न करत आहेत. ग्रामीण भागातील गुणवंत खेळाडूंना योग्य प्रशिक्षण, स्पर्धांच्या संधी आणि मार्गदर्शन मिळावे यासाठी ते सातत्याने कार्यरत आहेत. त्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल अहिल्यानगर कुस्ती संघाचे अध्यक्ष आमदार संग्राम जगताप तसेच निलेश मदने यांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

कार्यक्रमात उपस्थितांनी डॉ. संतोष भुजबळ यांच्या कार्याचा गौरव करत भारतीय कुस्ती क्षेत्रात त्यांनी दिलेल्या योगदानाचे कौतुक केले. तसेच संभाजी राजे कुस्ती केंद्राच्या माध्यमातून अधिकाधिक खेळाडूंना राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर संधी मिळावी, अशी अपेक्षाही व्यक्त करण्यात आली.

### हॉस्पिटलमध्ये पार्किंग सुविधा नसल्याने

# रुग्ण व नातेवाईकांची होणारी गैरसोय व अन्यायकारक हेळसांड थांबविण्याबाबत शिवसेनेचे जिल्हाधिकारी याना निवेदन

## अन्यथा शिवसेना पद्धतीने आंदोलन करणार – संभाजी कदम

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** नगर शहर सावेडी उपनगरातील हॉस्पिटल येथे शहरासह बाहेरील जिल्ह्यांतूनही मोठ्या प्रमाणात रुग्ण व त्यांचेनातेवाईक उपचारासाठी येत असतात. परंतु सदर हॉस्पिटलमध्ये गरजेच्या मानाने अत्यंत अपुरी पार्किंग व्यवस्था उपलब्ध आहे. विशेष म्हणजे उपलब्ध पार्किंग सुविधा देखील रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांसाठी पुरेशी नाही.या बाबतचे निवेदन जिल्हाधिकारी यांना शिवसेनेच्या वतीने देण्यात आले.

यावेळी शिवसेना शहर प्रमुख संभाजी कदम ,जेष्ठ नगरसेवक बाळासाहेब बोराटे ,विक्रम राठोड ,दत्तात्रय कावरे,कुणाल खेरे परेश लोखंडे ,अभिजित अष्टेकर ,प्रा विशाल शितोळे ,तृप्ती साळवे ,संग्राम कोतकर ,अरुण झेंडे ,संजय शेंडगे ,चंद्रकांत शेळके, विनय वाखुरे, प्रताप गडाख, संदीप दातरंगे,सलोनी शिंदे, नलिनी गायकवाड आदी उपस्थित होते.



या परिस्थितीमुळे रुग्ण व नागरिकांना आपली वाहने रस्त्याच्या दुतर्फा पार्क करावी। लागत आहेत. अशातच महानगरपालिकेमार्फत त्या परिसरात ''पे अँड पार्क'' सुविधा सुरू करण्यात आलेली आहे. प्रत्यक्षात रुग्णालयाने स्वतः पुरेशी पार्किंग व्यवस्था उपलब्ध करून देणे ही त्यांची जबाबदारी आहे. जर हॉस्पिटलकडे आवश्यक पार्किंग सुविधा उपलब्ध नसेल, तर महानगरपालिकेने संबंधित हॉस्पिटल प्रशासनावर योग्य ती कारवाई करणे आवश्यक आहे. परंतु त्याऐवजी आधीच आरोग्य व आर्थिक समस्यांनी त्रस्त असलेल्या रुग्ण व नातेवाईकांकडून ''पे अँड पार्क'' च्या माध्यमातून अतिरिक्त शुल्क आकारले जात आहे. ही बाब सर्वसामान्य नागरिकांच्या दृष्टीने अन्यायकारक असून त्यातून आर्थिक शोषण होत आहे.

तरी आपण सदर बाब गांभीर्याने लक्षात घेऊन खालीलप्रमाणे तातडीने कार्यवाही करावी, हॉस्पिटल परिसरातील ''पे अँड पार्क'' सुविधा तात्काळ बंद करण्यात यावी किंवा संबंधित हॉस्पिटल प्रशासनास पुरेशी पार्किंग व्यवस्था उपलब्ध करण्याबाबत निर्देश देऊन आवश्यक ती कारवाई करण्यात यावी. अन्यथा रुग्ण व सर्वसामान्य नागरिकांच्या हितासाठी शिवसेना तर्फे तीव्र आंदोलन करण्यात येईल.

# घरकुल लाभार्थ्यांना मोफत वाळू देण्याच्या मागणीसाठी जलसमाधी आंदोलन

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**पैठण–** घरकुल योजनेतील लाभार्थ्यांना मोफत वाळू उपलब्ध करून द्यावी तसेच अवैध वाळू उपसा करणाऱ्या वाळू माफियांना पाठीशी घालणाऱ्या महसूल विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, या मागण्यांसाठी पाटेगाव पुलाच्या खाली विविध सामाजिक संघटनांच्या वतीने सोमवारी जलसमाधी आंदोलन करण्यात आले.
या आंदोलनाद्वारे शासन व प्रशासनाचे लक्ष वेधण्याचा



प्रयत्न करण्यात आला. आंदोलकांनी गोदावरी नदीपात्रातील अवैध वाळू उपशामुळे महसूलाचे नुकसान होत असून घरकुल लाभार्थ्यांना मात्र वाळूसाठी मोठा आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत असल्याचा आरोप केला.

घरकुल बांधकामासाठी आवश्यक वाळू मोफत उपलब्ध करून देण्यासह अवैध वाळू व्यवसायाला संरक्षण देणाऱ्या संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांवर तातडीने कारवाई करण्याची मागणी आंदोलकांनी केली. मागण्या मान्य न झाल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशाराही यावेळी देण्यात आला.
या आंदोलनात अनिल राऊत, चंद्रकांत झारगड, शिवाजी साबळे गणेश पवार, बावणे यांच्यासह विविध सामाजिक संघटनांचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# शहरातील ओढे–नाले बुजविणाऱ्यांना संरक्षण देणाऱ्या अधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल करा – आमदार संग्राम जगताप

## आमदार संग्राम जगताप यांची एकविरा चौक ते तपोवन रोड काँक्रिटीकरण कामाची पाहणी; मनपा अतिक्रमण व नगररचना विभागातील अधिकाऱ्यांवर कारवाईची मागणी



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** राज्य शासनाच्या माध्यमातून शहरातील विकास आराखड्यातील (डीपी) रस्त्यांच्या कामांसाठी तब्बल दीडशे कोटी रुपयांचा निधी मंजूर करून आणला. शहराच्या भविष्यातील वाहतूक व्यवस्था, नियोजनबद्ध विकास आणि नागरिकांच्या सोयीसाठी ही कामे सुरू करण्यात आली. मात्र काही रस्त्यांची कामे अद्याप प्रलंबित आहेत तर काही रस्त्यांची कामे अर्धवट अवस्थेत असून नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. यासाठी महापालिकेच्या नगररचना विभागाने वेळेत लाईनआऊट देणे आणि अतिक्रमण विभागाने अडथळे दूर करणे गरजेचे असताना संबंधित विभागांकडून होत असलेल्या हलगर्जीपणामुळे विकासकामांना अडथळे निर्माण होत असल्याची तीव्र नाराजी आमदार संग्राम जगताप यांनी व्यक्त केली.

आमदार संग्राम जगताप यांच्या प्रयत्नातून सुरू असलेल्या एकविरा चौक ते तपोवन रोड दरम्यानच्या काँक्रिटीकरण रस्ता कामाची पाहणी करण्यात आली.
यावेळी आमदार संग्राम जगताप, महापौर ज्योतीताई गाडे, मनपा महिला व बालकल्याण समिती सभापती दिपालीताई बारस्कर, उपसभापती वर्षाताई सानप, माजी उपमहापौर गणेश भोसले, नगरसेवक निखिल वारे, बाळासाहेब पवार, महेश तवले, सुनील त्रिंबके ऋग्वेद गंधे, माजी सभापती कुमारसिंह वाकळे, किशोर डागवले, अविनाश घुले, गणेश कवडे, महेश लोंढे, अतिरिक्त आयुक्त नागेंद्र मुक्तेकर, मनोज पारखे, इंजिनिअर आदित्य बल्लाळ, इंजिनिअर गणेश गाडळकर यांच्यासह अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी आमदार संग्राम जगताप म्हणाले की, शहरातील विकासकामे ही पुढील वीस वर्षांचा विचार करून कायमस्वरूपी आणि नियोजनबद्ध पद्धतीने केली जात आहेत. मात्र महापालिकेतील काही अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या चुकीच्या कारभारामुळे ही कामे रखडत आहेत. रस्ते विकासासाठी आवश्यक असलेले लाईनआऊट वेळेत दिले जात नाहीत, अतिक्रमण हटविले जात नाही आणि त्यामुळे ठेकेदारांना काम करताना अडचणी येतात. काही ठिकाणी कामे सुरू होतात आणि अचानक थांबतात. यामुळे नागरिकांना वाहतुकीचा त्रास सहन करावा लागत असून व्यापाऱ्यांनाही आर्थिक फटका बसत आहे.

ते पुढे म्हणाले की, ठेकेदारांनी लाईनआऊट मिळाल्याशिवाय काम सुरू करू नये आणि एकदा काम सुरू केल्यावर ते अर्धवट सोडू नये. शहरातील सर्व प्रलंबित रस्त्यांची कामे तातडीने पूर्ण करून नागरिकांसाठी खुली करण्यात यावीत. महापालिका अतिक्रमण विभाग आणि नगररचना विभागातील अधिकारी–कर्मचाऱ्यांच्या चुकीच्या कारभारामुळे विकासकामांना अडथळे निर्माण होत असल्याने त्यांच्या विरोधात शासनाकडे कारवाईची मागणी करण्यात येणार आहे.

आमदार संग्राम जगताप यांनी यावेळी गंभीर आरोप करत सांगितले की, शहरातील अनेक ओढे आणि नाले बुजविण्याच्या प्रकारांना काही अधिकाऱ्यांचे अप्रत्यक्ष संरक्षण मिळत आहे.

# डॉ.पाऊलबुधे फार्मसी कॉलेजचा दशवार्षिक सोहळा वृक्षारोपणाने साजरा

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** वसंत टेकडी येथील सेवा शिक्षण प्रसारक मंडळाचे डॉ.एन.जे. पाऊलबुधे फार्मसी कॉलेज मध्ये जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून डॉ.पाऊलबुधे कॉलेज ऑफ फार्मसी यांच्या दशवार्षिक (२०१६–२०२६) सोहळ्याच्या शुभारंभा निमित्त महाविद्यालय या राष्ट्रीय सेवा योजना विभाग व फार्माकोग्नोसी विभागाच्या संयुक्त विद्यमाने वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.




महाविद्यालयाचे दहा वर्षांच्या यशस्वी शैक्षणिक प्रवासाचे प्रतीक म्हणून १० वृक्षांचे रोपण करण्यात आले. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देतानाच संस्थेच्या प्रगतीचा गौरव करणारा हा कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

कार्यक्रमास प्रमुख अतिथी संस्थेचे उपाध्यक्ष श्री. रामभाऊ बुचकुल, खजिनदार श्री. दादासाहेब भोईटे उपस्थित होते.

यावेळी संस्थेच्या प्रगतीचा आढावा घेताना सांगण्यात आले की, महाविद्यालयाची सुरुवात सन २०१६ मध्ये डी.फार्म. अभ्यासक्रमाने झाली. त्यानंतर २०१७ मध्ये बी.फार्म. अभ्यासक्रम सुरू करण्यात आला. संस्थेने सातत्याने शैक्षणिक व संशोधन क्षेत्रात प्रगती करत सन २०२४ मध्ये एम.फार्म. (फार्मास्युटिकल केमिस्ट्री, फार्मास्युटिक्स व फार्माकोलॉजी) हे पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरू करून आणखी एक महत्त्वपूर्ण टप्पा गाठला. अल्पावधीतच संस्थेने गुणवत्तापूर्ण शिक्षण, संशोधन आणि सामाजिक बांधिलकीच्या माध्यमातून फार्मसी शिक्षण क्षेत्रात वेगळी ओळख निर्माण केली आहे.कार्यक्रमास बी.फार्म. प्राचार्य डॉ. श्याम पंगा, डी.फार्म. प्राचार्या डॉ. अनुराधा चव्हाण, विभागप्रमुख डॉ.वेणू कोला,डॉ. रोशनी सूर्यवंशी, डॉ. प्रसाद घुगरकर, डॉ. विजय तारडे, प्रा. स्वाती कडनोर, सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या माध्यमातून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत प्रत्येकाने किमान एक वृक्ष लावून त्याचे संगोपन करण्याची शपथ घेतली. महाविद्यालयाच्या दशवार्षिक वर्षाच्या प्रारंभी आयोजित करण्यात आलेला हा उपक्रम विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरला.

# कोपरगावातील मध्यरात्रीच्या राड्यानंतर पोलीस ॲक्शन मोडवर; आरोपींचा शोध सुरू

दैनिक आकर्षण । विशाल लोंढे



**कोपरगाव** – कोपरगाव शहरात रविवारी मध्यरात्री घडलेल्या वाहन तोडफोडीच्या घटनेनंतर कोपरगाव शहर पोलीस प्रशासन ॲक्शन मोडवर आले आहे. शहरातील विविध भागांमध्ये, विशेषतः धारणगाव रोड परिसरात काही तरुणांच्या टोळक्याने दहशत माजवत वाहनांची तोडफोड केल्याची घटना समोर आल्यानंतर पोलिसांनी या प्रकरणाची गंभीर दखल घेतली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, रात्री उशिरापर्यंत सुरू असलेल्या या गोंधळामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. घटनेची माहिती मिळताच पोलीस यंत्रणा सतर्क झाली असून परिसरातील सीसीटीव्ही फुटेज, प्रत्यक्षदर्शींची माहिती आणि इतर तांत्रिक पुराव्यांच्या आधारे संबंधितांचा शोध सुरू करण्यात आला आहे.

कोपरगाव शहरात कायदा आणि सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पोलीस प्रशासनाकडून विशेष लक्ष दिले जात असून, अशा प्रकारे सार्वजनिक शांतता भंग करणाऱ्या आणि नागरिकांच्या मालमत्तेचे नुकसान करणाऱ्यांविरुद्ध कठोर कारवाई केली जाणार असल्याचे संकेत मिळत आहेत.

### काय घडलं?

रविवारी (दि. ७ जून) रात्री ११ ते पहाटे १ वाजेच्या दरम्यान कोपरगाव शहरातील विविध भागांमध्ये, विशेषतः धारणगाव रोड परिसरात काही तरुणांच्या टोळक्याने धुमाकूळ घातल्याची माहिती समोर आली. हातात धारदार हत्यारे व लाकडी दांडके घेऊन फिरणाऱ्या या टोळक्याने रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या अनेक वाहनांची तोडफोड केली. वाहनांच्या काचा फोडण्यात आल्या तसेच मोठ्या प्रमाणात नुकसान करण्यात आले. अचानक झालेल्या या प्रकारामुळे परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, घटनेचा तपास पोलीस प्रशासनाकडून सुरू आहे. या घटनेमागील नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसले तरी पोलीस सर्व बाजूंनी तपास करत आहेत. आरोपींची ओळख पटवून त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्यासाठी पोलीस पथके कामाला लागली असून, नागरिकांनी अफवांवर विश्वास न ठेवता पोलिसांना सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.कोपरगाव शहरात दहशत माजवणाऱ्यांवर पोलिसांचा वॉच... आरोपींचा शोध सुरू... आणि लवकरच या प्रकरणातील सत्य समोर येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# अनुसूचित जातीतील उपवर्गीकरण रद्द करण्यासाठी बीड ते मंत्रालय लाँग मार्च

## १५ जूनला अहिल्यानगरात आगमन । नियोजन बैठकीत हजारो भीमसैनिकांच्या सहभागाचा निर्धार

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** अनुसूचित जातीतील उपवर्गीकरण रद्द करण्याच्या प्रमुख मागणीसाठी बीड ते मंत्रालय, मुंबई दरम्यान आयोजित करण्यात येणाऱ्या लाँग मार्चच्या यशस्वी नियोजनासाठी तारकपूर बसस्थानक परिसरातील व्ही स्टार येथे महत्त्वपूर्ण बैठक संपन्न झाली. या बैठकीस लाँग मार्चचे प्रमुख संयोजक सिद्धार्थ शिनगारे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी निवृत्ती आरू होते.

यावेळी नगरसेवक सुरेश बनसोडे, अशोक गायकवाड, सुमेध गायकवाड, परिमल निकम, विजयराव भांबल, संजय खामकर, एन. एम. पवळे, शिवाजी साळवे, अमित काळे, विलास साठे, राजू उभाले, प्रा. जयंत गायकवाड, महेश भोसले,



कौशल गायकवाड, विशाल कांबळे, विशाल भिंगारदिवे, विशाल गायकवाड, प्रा डि आर जाधव, सागर ठोकळ, सचिन शेलार, शरद मेढे, प्रा एल बी जाधव, सिद्धार्थ आढाव, समीर भिंगारदिवे, सृजन भिंगारदिवे, दिपक अमृत, शिवाजी भोसले, छानराज क्षेत्रे, मयूर पाखरे, अजय पाखरे, दया गजभिये, पंकज लोखंडे, जयश्री गायकवाड, हनुमंत गायकवाड, वैभव जाधव, संकेत गव्हाले, श्रेयस भिंगारदिवे, सनी भाकरे यांच्यासह विविध संघटनांचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. बैठकीचे प्रास्ताविक विलास साठे यांनी केले.

बैठकीत माहिती देताना सांगण्यात आले की, १० जून रोजी बीड येथून लाँग मार्चला प्रारंभ होणार असून १५ जून रोजी हा मार्च अहिल्यानगर शहरात दाखल होईल. त्यानंतर विविध जिल्ह्यांतून मार्गक्रमण करत २६ जून रोजी मंत्रालय, मुंबई येथे धडक देण्यात येणार आहे.